**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र. : मुमाआ-२०२४/नों. क्र.१४/त. क्र.१२७/२४/०१

प्रति,
श्री. फारुकी रिजवान जब्बार
गुलशन नगर, बालेपीर नगर रोड,
ता.जि.बीड-४३११२२

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक
मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्या.
मुंबई डी.डी.बिल्डींग, २ रा मजला, जुने जकात घर,
शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ०२३.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | ०१-०१-२०२४ |
| सुनावणीचा दिनांक | : | २५-०४-२०२४ |
| तक्रारदार | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्र. मुमाआ/नो.क्र.५५३२/१९/अ.क्र.९६८/२२ मध्ये दि. ०१.०१.२०१४ ते दि. ०५.०३.२०१९ पर्यंतचे आपल्या मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ २ रा मजला. डि. डि. बिल्डिंग, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई या कार्यालयाचे आवक नोंदवहीची प्रमाणित प्रत कोर्ट कामासाठी देण्यात यावी अशी माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. २२-०८-२०२२ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक श्री. शेख शकील शेख शौकत यांना असे आदेश दिले होते की, अपिलकर्तांना पुढील ३० दिवसात ३ पर्यायी दिवस देवून संबंधित अभिलेखाचे निरीक्षण करण्याची संधी देण्यात यावी व त्यानंतर त्यांना हवी असलेली माहिती शुल्क आकारुन देण्यात यावी.

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.०१-०१-२०२४ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार दृकश्राव्य (ऑनलाईन) उपस्थित. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वसूली अधिकारी श्री.हसन जमादार, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र.उपव्यवस्थापक श्री.शेख शकील शेख शौकत उपस्थित आहेत.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदारांनी सूचित केले की, जन माहिती अधिकारींनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नाही. दि.२२-०८-२०२२ रोजी श्री.शेख यांना अपिलकर्तांना पुढील ३० दिवसात ३ अपिलकर्तांना पुढील ३० दिवसात ३ पर्यायी दिवस देवून संबंधित अभिलेखाचे निरीक्षण करण्याची संधी देण्यात यावी व त्यानंतर त्यांना हवी असलेली माहिती शुल्क आकारुन देण्यात यावी असे आदेश दिले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी तत्कालिन जन माहितो अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र.उपव्यवस्थापक श्री.शेख शकील शेख शौकत यांनी सूचित केले की, आयोगाचे दि.२२-०८-२०२२ चे आदेश दि.२२-०९-२०२२ रोजी प्राप्त झाले व त्यानंतर कारवाई केली नाही. या संदर्भात दिनांक १५-०३-२०१९ रोजी अवलोकनसाठी सूचना दिली होती. त्यानंतर आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी का केली नाही याबाबत काहीच स्पष्ट होत नाही.

अभिलेखावरुन स्पष्ट होते की, आयोगाचे आदेशानंतर तत्कालिन जन माहिती अधिकारींनी काहीच कारवाई केली नाही.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## अंतरिम आदेश

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी सहाय्यक व्यवस्थापक श्री. शेख शकील शेख शौकत यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही आणि त्याबाबतचा समर्पक खुलासा सुध्दा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुध्द कलम २० (१) नुसार रुपये २५०००/- (रुपये पंचवीस हजार) इतका दंड का करु नये ? याबाबत खुलासा सादर करण्यास अंतिम संधी देण्यात येत आहे. सबब, याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, अन्यथा, अपिलार्थीस जाणुनबुजून माहिती दिली नाही, असे समजून दंडात्मक कारवाई कायम करण्यात येईल.
२. तक्रारदाराचा तक्रार अर्ज मान्य करण्यात येत आहे.
३. अर्जदाराचा तक्रार अर्ज अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक : २५-०४-२०२४

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission
Maharashtra